नागपूर शहरातील **सोनेगांव तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालीकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत तसेच अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः २८ एप्रिल,२०१०.

वाचाः-या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१७ मार्च, २०१० व समक्रमांकाचा शुध्दीपत्रक दि.३० मार्च, २०१०.

**प्रस्तावनाः-**

राज्यातील तलाव/सरोवर व मोठे जलाशय यांच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सरोवर संवर्धन योजना सन २००६-२००७ या वर्षापासून राज्यात सुरु करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नागपूर येथील सोनेगांव तलावाच्या पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व सौंदर्यीकरण कामाच्या एकूण रुपये ३२४.८४ लाख एवढया रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ७० टक्के हिस्सा रुपये २२७.३९ लाख एवढी रक्कम राज्य शासनाकडून तसेच ३० टक्के हिस्सा म्हणून रुपये ९७.४५ लाख इतकी रक्कम मंजूर आहे. राज्य हिस्स्यापैकी रू.१३.०० लाख एवढी रक्कम नगर परिषदेस संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे मुक्त करण्यात आली आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमांसाठी ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण या मुख्य लेखाशिर्षाखाली एकूण रुपये ५००.०० लाखाची तरतूद मंजूर आहे. त्यापैकी निधी मुक्त करावयाचा शासन विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नागपूर शहरातील सोनेगाव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी यापूर्वी मंजूर एकूण रु.३२४.८४ लाखांपैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्यांचे ७० टक्के म्हणजेच रुपये २२७.३९ लाखापैकी रुपये १३.०० लाख निधी संदर्भाधीन शासननिर्णयान्वये मुक्त करण्यात आला असून, आता **या शासन निर्णयाद्वारे रुपये ५०.०० लाख (अक्षरी रूपये पन्नास लाख फक्त)** आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना वितरीत करण्यास संदर्भाधीन दिनांक १७ मार्च,२०१० च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. **यासाठी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर, (Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur) यांचे नावे रुपये ५०.०० लाख (अक्षरी रूपये पन्नास लक्ष फक्त) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

३. सदर होणारा खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंदाज २०.१०/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३ दिनंक ०३.४.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५.                सदर शासन निर्णय शासनाच्या सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाव
(www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००५१०२०२०३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दे.के.मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नागपूर.
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.